# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८
दूरध्वनी -२३०२३९००/ २३०७५५३९ Website : www.msrtc.gov.in फॅक्स - २३०८६३५२

**प्रसिध्दी पत्रक क्र. ७**

## - एस.टी. ची टोल फ्री हेल्पलाईन सुरु -

**मुंबई, बुधवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०१०**

प्रवाशांच्या तक्रारी / सूचनांची त्वरीत दखल घेण्यासाठी व रा. प. सेवेची माहिती देण्यासाठी रा. प. महामंडळाने १८०० २२ १२५० ही " टोल फ्री हेल्पलाईन " सुरु केली आहे. आज या हेल्पलाईनचे उद्घाटन मा. ना. श्री. राधाकृष्ण विखे - पाटील यांचे शुभहस्ते झाले. यावेळी रा. प. महामंडळाचे अध्यक्ष मा. श्री. सुधाकरपंत परिचारक आणि उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. दीपक कपूर उपस्थित होते.

सुरुवातीस, सदर हेल्पलाईन सकाळी ७ ते रात्रौ १०.०० वाजेपर्यंत कार्यरत राहणार असून रा. प. महामंडळाच्या मुंबईस्थित मध्यवर्ती कार्यालयात यानिमित्त विशेष हेल्पलाईन कक्ष स्थापन करण्यांत आला आहे. या कक्षात सहा प्रशिक्षित कर्मचा-यांची नियुक्ती करण्यांत आली आहे. मुंबईतील एमटीएनएल व राज्यातील बीएसएनएलच्या सर्व दूरध्वनीवरुन तसेच निवडक खाजगी मोबाईल ऑपरेटरांच्या दूरध्वनीवरुन प्रवाशांना या हेल्पलाईनशी मोफत संपर्क साधता येणार आहे.

आधुनिकतेकडे झपाटयाने वाटचाल करणा-या एस. टी. ने यापूर्वी वाहकांसाठी इलेक्ट्रॉनिक तिकिट यंत्रे, संगणकीय आरक्षण सेवा, इंटरनेटद्वारे घरबसल्या आरक्षण इ. सेवा प्रवाशांना उपलब्ध करुन दिल्याचे मा. परिवहनमंत्र्यांनी आवर्जून सांगितले. त्याचप्रमाणे, भविष्यात एस. टी. प्रशासनाने पुढील महत्त्वाच्या बाबींकडे प्रामुख्याने लक्ष देण्याच्या सूचना केल्या.

~ राज्यातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहकार्याने पॅकेज टूरची शक्यता पडताळून पाहावी.

~ राज्यातील आदिवासी भागातील डोंगराळ प्रदेशांसाठी तसचे घाटरस्ते आणि अरुंद रस्त्यांनी जोडलेल्या गावांसाठी मिडीबसेसची व्यवस्था करावी.

~ खाजगी वाहतूकदार चालवित असलेल्या मार्गावर एस. टी. ने सुध्दा वातानुकुलित सेवा सुरु करुन समर्थ पर्याय उभा करावा.

~ प्रवासी जनतेस सुरक्षित सेवा देण्या-या चालक / वाहकांसाठी त्यांच्या विश्रांतीगृहात आरामदायी व्यवस्था प्रामुख्याने पुरविण्यांत यावी.

~ वातानुकुलित व आराम बसेस खरेदी कराव्यात तसेच भाडेतत्वावरसुध्दा बसेस घेण्याविषयी कार्यवाही सुरु करावी.

~ आगामी तीन महिन्यांत सुमारे १७,००० कर्मचा-यांची भरती करावी.

~ रा. प. महामंडळास आर्थिकदृष्टया सक्षम बनविण्यासाठी करावयाच्या उपक्रमांचा व्यापारी आराखडा ( Business Plan ) तयार करुन दोन महिन्यात शासनास सादर करावा.

प्रवाशांनी या हेल्पलाईनचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन रा. प. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. दीपक कपूर यांनी केले आहे.

**सहा. जनसंपर्क अधिकारी**